सा. महाराष्ट्र 30 जून 2003



डॉ. क्रांतीकुमार पाटील
प्राचार्य, कोल्हापूर

# 'निडबेस' व्यवस्था हवी

**मे**कॅलोने जन्माला घातलेल्या कारकून निर्मिती करणाऱ्या शैक्षणिक व्यवस्थेचा वारसा आपण जपला आहे. जीवनासाठी आणि जगण्यासाठी उपयोगी ठरणारा शैक्षणिक व अभ्यासक्रमिक बदल आपण करायला हवा होता; परंतु दुर्दैवाने तो केलेला नाही. पाश्चात्त्य राष्ट्रांमध्ये 'सिटी युनिव्हर्सिटी' संकल्पना राबवून शहराशी निगडित आणि समाजाच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची रचना केली जाते. त्या पद्धतीचे शिक्षण देऊन मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे नोकऱ्याही मिळतात. अशा पद्धतीचे बदल आपल्याकडे व्हायला हवे होते. अभ्यासक्रमामध्ये बदल केले जाणे आवश्यक होते. मात्र, तसे झालेले नाही, असे मत कोल्हापूरचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे आहे. व्होकेशनल कोर्सेसचा उदय या विचारांतूनच झाला खरा. १०-२-३ या आकृतीबंधाला छेद देत '२' स्तरावर व्यावसायिक अभ्यासक्रम निर्माण करून '३' स्तरावर वाढणारा लोंढा '२' मध्ये थोपविण्याचा प्रयत्न झाला. यात काही प्रमाणात यश आले तरी ज्या मोठ्या प्रमाणात बदल होणे अपेक्षित होते तेवढा झालेला नाही. रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाची आजची गरज आहे. असा बदल लवकरात लवकर स्वीकारावा लागेल. शासन आणि विद्यापीठे यांनी मिळून समाजाला पूरक अशी 'निडबेस' व्यवस्था निर्माण केली पाहिजे, अन्यथा आम्ही बेकारांच्या फौजा निर्माण करत राहू आणि त्या एक दिवस स्फोटक बनतील. त्यावेळी ही पिढी कुणाचेच ऐकणार नाही, असे ते म्हणाले.

उद्योगधंदे आणि शिक्षण यांची सांगड घातली पाहिजे, या दोहोंचे संबंध दृढ व्हायला हवेत. अलीकडच्या काळात उद्योगपती स्वतंत्र शाळाच निर्मिती करू लागलेले आहेत. ही संकल्पना यातूनच पुढे आली आहे. त्या-त्या ठिकाणी कोणते मनुष्यबळ आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन शिक्षणाची रचना केली पाहिजे. आज आहे हीच परिस्थिती पुढे चालू राहिली तर मात्र आर्टस्, कॉमर्सला नजीकच्या काळात काही भवितव्य राहील की नाही, सांगता येणार नाही.